# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः04.02.2026** **वारःबुधवार**

1. भारत-अमेरिका व्यापार कराराचं विविध स्तरातून स्वागत; शेअर बाजारातही तेजी
2. लोकसभेत बेशिस्त वर्तन केल्याबद्दल 8 खासदारांचं, अधिवेशन काळासाठी निलंबन
3. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची पुणे आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती
4. ठाणे, कल्याण-डोंबिवली, वसई-विरारमध्ये नव्या महापौर आणि उपमहापौरांची निवड आणि
5. मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या, पालघर जिल्ह्यातील दुसऱ्या बोगद्याचं काम पूर्ण

**भारत-अमेरिका करार**

अमेरिकेनं भारतीय उत्पादनांवरच्या आयात शुल्कात घट केल्याचं काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशातून सांगितलं. तसंच भारत अमेरिका यांच्यातल्या महत्त्वपूर्ण व्यापार करारावरही दोन्ही देशांची सहमती झाली. या घटनेचं काल उद्योग क्षेत्रासह विविध स्तरातून जोरदार स्वागत करण्यात आलं.

भारत-अमेरिका व्यापार करार हा भारताचं भवितव्य सुनिश्चित करणारा करार असून, यामुळे प्रत्येक भारतीयाचं हित साधलं जाईल, असा विश्वास केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत व्यक्त केला. या करारामुळे भारताचं जागतिक अर्थव्यवस्थेतलं स्थान पक्कं होईल. या कराराचा कृषी, दुग्धविकास, पशुपालन आदी क्षेत्रांना फायदा होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

भारत आणि अमेरिकेदरम्यानचा हा व्यापारी करार, उभय देशांदरम्यान असलेल्या मैत्रीचा नवीन अध्याय आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. या करारामुळे भारतीय व्यावसायिकांसाठी अनेक नवीन आणि उत्साहवर्धक संधींची दारं खुली होतील. हा करार राज्यातल्या व्यवसायांसाठी नवं क्षितिज खुलं करेल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

केंद्र तसंच राज्यातल्या अनेक मंत्र्यांनीही या कराराचं स्वागत केलं आहे.

भारत-अमेरिका व्यापार कराराच्या घोषणेमुळे देशांतल्या शेअर बाजारात काल तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक दिवसअखेर 2 हजार 73 अंकांची वाढ नोंदवून, 83 हजार 739 अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी 639 अंकांची तेजी नोंदवून 25 हजार 728 अंकांवर बंद झाला.

**संसद कामकाज**

लोकसभेत काल राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा चीनचा मुद्द उपस्थित केला; त्यानंतर झालेल्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज तहकूब करण्यात आलं. त्यानंतर युरोपियन महासंघ आणि अमेरिकेशी झालेल्या,कराराच्या मुद्द्यावरून झालेल्या गदारोळामुळे कामकाज तहकूब करण्यात आलं. या गदारोळात विरोधी पक्षाच्या काही सदस्यांनी सभापतींच्या आसनाच्या दिशेनं कागद भिरकावले. या सदस्यांच्या विरोधात, केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी मांडलेला निलंबन प्रस्ताव आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला.

लोकसभेत बेशिस्त वर्तन केल्याबद्दल विरोधी पक्षाच्या आठ खासदारांना अधिवेशनाच्या उर्वरित काळासाठी निलंबित करण्यात आलं. यात भंडारा-गोंदियाचे खासदार प्रशांत पडोळे यांच्यासह कॉंग्रेसच्या सात तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या एका खासदाराचा समावेश आहे.

**मुख्यमंत्री-भूसंपादन आढावा**

राज्यात पायाभूत सुविधा आणि औद्योगिक विकासासाठीची भूसंपादन प्रक्रिया गतीने आणि पारदर्शक पद्धतीने राबवावी; आणि, प्रकल्पांसाठी जमीन देणाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. या संदर्भात काल, मुंबईत, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली.

**मुख्यमंत्री-पुरंदर विमानतळ**

मुख्यमंत्र्यांनी काल पुण्याजवळील पुरंदर विमानतळ विकासकामांचाही आढावा घेतला. वेगानं होत असलेल्या पायाभूत सुविधांच्या विकासामुळे पुणे शहर आणि परिसरात औद्योगिकीकरण वाढत आहे. भविष्यातील पुणे शहराची गरज लक्षात घेऊन पुरंदर विमानतळाची निर्मिती करावी, असे निर्देश त्यांनी या बैठकीत दिले. विमानतळ विकासामध्ये सिडको, नगरविकास विभाग आदि यंत्रणांनी आपली जबाबदारी निश्चित करून ती यशस्वीपणे पार पाडावी अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत दिल्या.

**सुनेत्रा पवार-पालकमंत्री**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची पुणे आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाने काल यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली अपघाती निधनानंतर या जिल्ह्यांचं पालकमंत्री पद रिक्त झालं होतं.

**जिल्हा परिषद निवडणूक**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या कामकाजाकरता पुणे जिल्ह्यातल्या 13 तालुक्यांत मिळून, 23 हजार 114 मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तसंच जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे. जिल्ह्यात एकंदर 3 हजार 605 मतदान केंद्रं स्थापन करण्यात येणार असून, प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे 13 आदर्श आणि महिला मतदान केंद्र असणार आहेत.

दरम्यान, केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा देणाऱ्या शिक्षकांना जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या कर्तव्यातून सूट देण्यात आली आहे. याबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आल्याचं राज्य निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

**महापौर**

ठाणे महानगरपालिकेच्या महापौरपदी शिवसेनेच्या शर्मिला पिंपळोलकर यांची, तर उपमहापौरपदी भारतीय जनता पक्षाचे कृष्णा पाटील यांची काल निवड करण्यात आली.

कल्याण-डोंबिवलीच्या महापौर म्हणून शिवसेनेच्या हर्षाली थविल आणि उपमहापौरपदी भाजपचे राहुल दामले यांची बिनविरोध निवड झाली.

उल्हासनगर महापालिकेच्या महापौर पदी शिवसेना शिंदे गटाच्या अश्विनी निकम यांची, तर उपमहापौर पदी भाजपाच्या अमर लुंड यांची निवड करण्यात आली.

वसई-विरार महानगरपालिकेच्या महापौरपदी बहुजन विकास आघाडीचे अजीव पाटील यांची महापौर म्हणून उपमहापौर पदी बहुजन विकास आघाडीच्याच मार्शल डॉमनिक लोपीस यांची बहुमतानं निवड करण्यात आली.

पुणे महापालिकेच्या महापौर पदासाठी भाजपकडून नगरसेविका मंजुषा नागपुरे तर, कॉंग्रेस पक्षातर्फे अश्विनी लांडगे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. उपमहापौर पदासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या आठवले गटाचे परशुराम वाडेकर यांना उमेदवारी देण्यात आली असून, कॉंग्रेस पक्षातर्फे साहिल केदारी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

दरम्यान पुणे महापालिकेत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षानंही ऐनवेळी उमेदवार उभे केले. राष्ट्रवादीतर्फे महापौर पदासाठी शीतल सावंत आणि उपमहापौर पदासाठी दत्ता बहिरट यांनी अर्ज दाखल केल्याने आता पुण्यात तिरंगी लढत होणार आहे.

नागपूर महापालिकेत भाजपने महापौरपदासाठी नीता ठाकरे यांना आणि उपमहापौरपदासाठी लीला हातीबेद यांना उमेदवारी दिली आहे. तर, कॉंग्रेसने स्नेहल ठाकरे यांना महापौरपदासाठी आणि विकास निकोसे यांना उपमहापौरपदासाठी उमेदवारी दिली आहे.

नाशिक महापालिकेच्या महापौरपदासाठी भाजपच्या हिमगौरी आडके आणि उपमहापौरपदासाठी मच्छींद्र सानप यांची उमेदवारी निश्चीत करण्यात आली आहे. तर, शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या वतीने महापौरपदासाठी रंजना बोराडे यांनी, आणि उपमहापौरपदासाठी विलास शिंदे, राहुल दिवे आणि प्रविण तिदमे यांनी अर्ज दाखल केला.

**पालघर-टनेल**

मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाअंतर्गत पालघर जिल्ह्यातल्या डहाणूमधल्या जामशेत इथे बांधण्यात येणाऱ्या दुसऱ्या बोगद्याचं काम पूर्ण झालं असल्याची घोषणा केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल केली. हा बोगदा 4 शे 54 मीटर लांब आणि सुमारे 15 मीटर रुंद असून, न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग पद्धतीने या बोगद्याचं काम करण्यात आलं आहे. एक महिन्यांपूर्वी, जिल्ह्यातील सफाळे

जवळ, पहिल्या बोगद्याचं काम पूर्ण झालं होतं. आतापर्यन्त 334 किलोमीटरचा लोहमार्ग आणि 417 घाट आणि पूलांचं काम पूर्ण झाल्याची माहितीही वैष्णव यांनी दिली.

**<u>शिंदे-प्रदूषणकारी प्रकल्प</u>**

आगामी जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल रत्नागिरी शहर आणि चिपळूण इथे प्रचार सभा घेतल्या. परदेशांत बंदी घालण्यात आलेले प्रदूषणकारी प्रकल्प कोकणात होणार नाहीत असं आश्वासन शिंदे यांनी काल चिपळूणमधल्या प्रचारसभेत दिलं.

**<u>सांगली-प्रचार</u>**

सांगली जिल्हा परिषदेच्या 61 गट आणि पंचायत समितीच्या 122 गणांसाठी सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला आहे. भारतीय जनता पार्टीच्या वतीनं मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काल खानापूर, पलूस आणि कडेगाव तालुक्यात प्रचार सभा घेतल्या. आमदार जयंत पाटील आणि आमदार विश्वजीत कदम यांनी पलूस तालुक्यात प्रचार सभा घेतल्या.

**<u>शासकीय अधिकारी मराठी संमेलन</u>**

नवी दिल्लीत येत्या 7 आणि 8 मार्चला, पहिलं 'अखिल भारतीय मराठी महिला शासकीय अधिकारी साहित्य संमेलन' आयोजित करण्यात आलं आहे. प्रशासकीय सेवेतल्या महिला अधिकाऱ्यांच्या साहित्यिक प्रतिभेला हक्काचं व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आणि महाराणी तारा राणी यांच्या 3 शे 51 व्या जयंतीनिमित्त सरहद, पुणे आणि महाराष्ट्र सदन नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन होणार आहे.

**<u>निधन-नाशिक</u>**

राष्ट्रवादी काँग्रेस, अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष ॲड. रवींद्र पांडुरंग पगार यांचं अल्पशा आजारानं काल संध्याकाळी निधन झालं. ते 64 वर्षांचे होते. 2012 पासून पक्षाचे नाशिक जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांनी राष्ट्रवादीच्या, जिल्ह्यातल्या प्रसारात मोलाचं योगदान दिलं. बागलाण तालुक्यातल्या उत्राणे इथं आज दुपारी 3 वाजता त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या काही भागात किमान तापमानात सरासरीपेक्षा किंचित वाढ झाली आहे. दरम्यान , सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागांनं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.